PADMABHUSHAN VASANTDADA PATIL PRATISHTHAN'S
COLLEGE OF ENGINEERING
TRUST REGD. NO. F 6736 (MUMBAI)
NBA ACCREDITED COURSES : (During 15.03.2012 to14.03.2015) COMP.ENGG./ ELEX. ENGG. / EXTC. ENGG./ I.T.
(F.No 28-110 / 2010 - NBA Dated 02/04/2012)

पी.व्ही.पी.पी.कॉ/कार्या./२०१८-१९/32 दिनांक १३.०७.२०१८

# परिपत्रक

(जात वैधता प्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेयर :-अनुसुचित जाती (SC)/ अनुसुचित जमाती (ST)/इतर मागासवर्ग (OBC)/विशेष मागास वर्ग (SBC) /विमुक्त भटक्या जमाती (VJNT))

शैक्षणिक वर्ष २०१८ – १९ मध्ये प्रथम वर्ष /थेट व्दितीय वर्षामध्ये प्रवेश घेणा-या विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी शासनाच्या दिनांक २४.०६.२०१८ रोजीच्या अध्यादेशास अनुसरून तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र. २अ /एडीएम/२०१८/८७२, दिनांक १२ जुलै २०१८ नुसार अनुसुचित जाती (SC)/ अनुसुचित जमाती (ST)/इतर मागासवर्ग (OBC)/विशेष मागास वर्ग (SBC) /विमुक्त भटक्या जमाती (VJNT) या प्रवर्गातील विदयार्थ्यनी केंद्रिय प्रवेश प्रक्रियेकरिता अर्ज केल्यासंबधातील पावती सादर करून अर्ज स्वीकृती व प्रवेश प्रक्रियेत सहभागी करण्यात आले होते अशा विदयार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत |
|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी | १०.०८.२०१८ |
| २ | थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी | ३०.०८.२०१८ |

या अनुषंगाने सर्व प्रवेशित विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सदर प्रमाणपत्रे विहीत कालावधीत प्राप्त करून महाविदयालयामध्ये अथवा प्रवेश निश्चिती केंद्रावर उपरोक्त तक्त्यामध्ये विहित केलेल्या दिनांकापर्यंत सादर न केल्यास अशा विदयार्थ्यांचे प्रवेश रदद करण्यात येतील याची संबधित विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. आलम एन. शेख)
प्राचार्य
Principal
Padmabhushan Vasantdada Patil Pratishthan's
College of Engineering
Sion, Chunabhatti,
MUMBAI - 400 022.

सोबत;
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
यांचे पत्र क्र. २अ /एडीएम/२०१८/८७२, दिनांक १२ जुलै २०१८

P.V.P.P. College of Engg., Sion-Chunabhatti * Mumbai 22.

प्रत:
१. नोटीसबोर्ड २. कॉलेज वेबसाईट

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम /२०१८/ ८७२
दिनांक : 12 JUL 2018

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता तसेच आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त करून सादर करणेबाबत....

संदर्भ: संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१८/८२७, दिनांक २८.६.२०१८ व क्रमांक २अ/एडीएम/२०१८/८४८, दिनांक २.७.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी शासनाच्या दिनांक २४.६.२०१८ रोजीच्या अध्यादेशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून अर्ज स्वीकृती व प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले आहे. अशा उमेदवारांना जात वैधता तसेच आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार अभ्यासक्रमनिहाय जात वैधता व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचे दिनांक निश्चित करण्यात आलेले आहेत.

अभ्यासक्रमनिहाय जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत |
|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी | १०.८.२०१८ |
| २ | प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी पदवी | १०.८.२०१८ |
| ३ | प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी | १०.८.२०१८ |
| ४ | प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेकनॉलॉजी पदवी | १०.८.२०१८ |
| ५ | प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी | १०.८.२०१८ |
| ६ | प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी | १९.८.२०१८ |
| ७ | प्रथम वर्ष एम.आर्च. पदव्युत्तर पदवी | १९.८.२०१८ |
| ८ | प्रथम वर्ष एम.एचएमसीटी पदव्युत्तर पदवी | १९.८.२०१८ |
| ९ | प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी | २७.८.२०१८ |

| | | |
|---|---|---|
| १० | प्रथम वर्ष एम.फार्म. पदव्युत्तर पदवी | २७.८.२०१८ |
| ११ | थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी | ३०.८.२०१८ |
| १२ | थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी | ३०.८.२०१८ |

या अनुषंगाने सर्व प्रवेशित तसेच जागा वाटप झालेल्या उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आवश्यक ती प्रमाणपत्रे विहीत कालावधीत प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा जेणेकरून त्यांना विहीत मुदतीत प्रमाणपत्र सादर करता येतील व त्यांचे प्रवेश अबाधित राहतील.

अभ्यासक्रमनिहाय जात वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांनी प्रवेश घेतलेल्या संस्थेत अथवा प्रवेश निश्चिती केंद्रावर उपरोक्त तक्त्यामध्ये विहीत केलेल्या दिनांकापर्यंत सादर न केल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतील याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी आणि पदव्युत्तर संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील प्रवेश वाटप झालेल्या ज्या उमेदवारांनी वरील प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून प्रवेश प्रक्रियेत सहभाग घेतला होता त्यांचेकडून वरील मुदतीत आवश्यक प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्वरीत त्याची ऑनलाईनपध्दतीने न चुकता नोंद करण्यात यावी व त्याची पोचपावती संबंधित उमेदवारांना त्वरीत देण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सविनय सादर

प्रत : माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना कळविण्यात यावी.
२. संबंधित सर्व प्रवेश निश्चिती केंद्र,त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेले प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने नोंद करुन त्याची पोचपावती संबंधित उमेदवारास देण्याची कार्यवाही करावी.